| MHAH070003432024 | दाखल दिनांक | : | ०४/०४/२०२४ |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | ०४/०४/२०२४ |
| | निकाल दिनांक | : | ०५/०७/२०२५ |
| | कालावधी | : | ०१ वर्षे ०३ महिने ०१ दिवस |

**अतिरिक्त सत्र न्यायाधीश, संगमनेर, जिल्हा अहमदनगर**

**येथील न्यायालयात**

(न्यायाधीश – मंदार नेरलेकर)

फौजदारी अपील क्रमांक ०९ सन २०२४

निशाणी क्र.२५

विलास रंगनाथ शिंदे
वयः– ३७, उद्योग– शेती
रा. ओझर खुर्द, तालुका – संगमनेर,
जिल्हा – अहिल्यानगर.

अपीलार्थी
(मुळ उत्तरार्थी १)

विरुद्ध

१. आरती विलास शिंदे
वयः– २७, उद्योग– गृहिणी.

२. अद्वीका विलास शिंदे
वयः– ६, उद्योग–शिक्षण.
तर्फे व करीता अ.पा.क. जनक आई
उत्तरार्थी क्र.१
उत्तरार्थी क्र.१ व २ रा.
द्वाराः– ज्ञानेश्वर भाऊराव रहाणे
टाकेश्वर महादेव मंदीराजवळ, गुंजाळवाडी
(गोल्डन सिटी), तालुका – संगमनेर,

उत्तरार्थी क्र.१ व २
(मुळ अर्जदार क्र.१ व २)

जिल्हा – अहिल्यानगर.

३. अलका उर्फ परिघा रंगनाथ शिंदे | (मुळ उत्तरार्थी २ व ३)

वयः– ६६, उद्योग– शेती

४. रंगनाथ जिजाबा शिंदे

वयः– ७४, उद्योग– शेती

उत्तरार्थी ३ व ४ रा. ओझर खुर्द, तालुका – संगमनेर,

जिल्हा – अहिल्यानगर.

घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण

अधिनियम २००५ चे कलम २९ अन्वये अपील

अधिवक्ते–

श्री. अभिजित विटोरे – अपीलार्थींकरीता

श्री. एम.बी.गुंजाळ – उत्तरार्थींकरीता

– न्यायनिर्णय –

(दिनांक ०५ जुलै २०२५)

१. घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम (येथून पुढे 'डी.व्ही.') चे कलम १२, १८, २० ते २३ नुसार उत्तरार्थी आरती व अद्वीका (मुळ अर्जदार क्र.१ व २) यांनी अपीलार्थी विलास व उत्तरार्थी अलका व रंगनाथ यांचेविरुद्ध दाखल केलेल्या फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१०२०/२०२२ याकामी अद्वीकाचा ताबा मिळण्यासाठीचा विलासचा नि.१४ चा अर्ज प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, संगमनेर यांनी दिनांक २८.०२.२०२४ रोजी नामंजूर केला. त्या आदेशाने व्यथित होवून विलासने सदरचे अपील दाखल केले आहे.

सोयीकरीता पक्षकारांना त्यांचे नावाने संबोधले आहे.

फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१०२०/२०२२ चे निशाणी १४ अर्जामधील कथनेः–

२. आरती व विलास यांना अद्वीका ही मुलगी असून ती सिनीयर के.जी.पोदार स्कूल, संगमनेर येथे शिक्षण घेत आहे. विलास व त्याचे कुटुंबाला अद्वीकाशिवाय राहणे अशक्य झाले आहे. त्यांचे तिच्यावर अतोनात प्रेम आहे. विलासने वेळोवेळी आरती व तिचे आईवडील व नातेवाईक यांना अद्वीका हीस भेटण्यासाठी विनंती केली, परंतू ते अद्वीकास भेटू देत नाहीत व तिला कोर्टात देखील हजर ठेवत नाहीत. अद्वीकाच्या शाळेमध्ये तिला भेटण्यासाठी विलासने अर्ज केला. त्यावेळी विलास व त्याचे कुटुंबास भेटू न देणेबाबत आरतीने अर्ज दिला असल्याचे समजले. आरती व तिच्या नातेवाईकांनी विलासला मारहाण केली. त्यामुळे विलास व त्याचे कुटुंबास अद्वीकाचे प्रेमापासून मुकावे लागत आहे. दर शनिवारी शाळा बंद झाल्यानंतर अद्वीका हिस त्याचेसोबत घरी घेवून जाण्याच्या परवानगीसाठी व न्यायालयात वेळोवेळी असणा–या तारखांना अद्वीकास भेटण्यासाठी विलासने अर्ज नि.१४ दिला.

३. आरतीने नि.१४ साठी दिलेले लेखी उत्तर सदर अपीलासोबत दाखल केलेले नाही.

निशाणी १४ चा आदेश–

४. उभय पक्षकारांची विवाद्य कथने विचारात घेवून सुविद्य प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, संगमनेर यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १०२०/२०२२ मधील अर्ज निशाणी १४ दिनांक २८.०२.२०२४ चे आदेशाने अर्ज नामंजूर केला.

अपिलाची कथने–

५. सुविद्य प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी कायदा व वस्तुस्थिती लक्षात न घेता आदेश केला. डी.व्ही.ॲक्टचे कलम २१ चे अवलोकन करणे आवश्यक होते. विलास अद्वीकाचे जनक पिता आहेत. अद्वीकास विलास व आरती या दोघांच्या प्रेमाची व संगोपनाची आवश्यकता आहे. विलासकडून

अद्वीकाच्या जीवास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे असे म्हणणे बेकायदेशीर आहे. अद्वीका ही साधारणपणे दोन वर्षापासून आरतीच्या ताब्यात आहे. आरतीने अद्वीकास दरम्यानच्या काळात कधीही विलासला भेटू दिले नाही. त्यामुळे अद्वीका ही स्वाभाविकपणे विलासला भेटण्यास नकार देत आहे. विलासने अद्वीकास भेटण्याचा प्रयत्न केला असता आरतीने विलासविरुद्ध खोटया स्वरुपाच्या तक्रारी संगमनेर पोलीस ठाणेत केल्या आहेत. विलास हा अद्वीकास दिवाळसणासाठी सन २०२२ साली विलासच्या घरी घेवून आला होता. त्यावेळी विलासने अद्वीकाचा मोबाईलमध्ये व्हीडीओ शुट केला होता. त्यामध्ये अद्वीका विलासला सांगते की, "मला नेण्यासाठी दर १० दिवसांनी येत जा". अद्वीकास आणण्यासाठी दि.०५.११.२०२२ रोजी विलास गेला असता आरतीचे आईवडील व भावाने विलासला मारहाण करुन काढून दिले. त्याबाबत विलासने आरती व तिचे आईवडीलांविरुद्ध संगमनेर शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला आहे. विलासचे आईवडील वृद्धापकाळाने वयस्कर झालेले असून ते नेहमी आजारी असतात. त्यांना नातवंड सुखाची नितांत गरज आहे. अपीलार्थीचा नि.१४ चा अर्ज मंजूर व्हावा अशी विलासची मागणी आहे.

युक्तीवादः–

६. अपीलार्थी विलासचे सुविद्य वकील श्री.अभिजित विटोरे यांचा युक्तीवाद असा की, अद्वीका ही सात वर्षाची आहे. गेले तीन वर्षे ती तिच्या आईसोबत राहत आहे. त्यामुळे ती विलासकडे येण्यास नाखुशी दर्शविते. अद्वीकाचे हिताचा विचार करता तिला दोन्ही पालकांचे प्रेम मिळणे आवश्यक आहे. अद्वीकाचे न्यायालयातील रडणे व तिची भिती हे तिला पढविल्याचा परिणाम आहे. उभय पक्षकारांमधील न्यायालयीन प्रकरणांची संख्या कमी व्हावी यासाठी अर्जदाराने डी.व्ही. अर्जात मुलीला भेटण्यासाठी अर्ज दिला होता.

७. अपीलार्थीच्या सुविद्य वकीलांनी त्यांच्या युक्तीवादाच्या समर्थनार्थ

खालील नमुद न्यायनिवाडयांचा आधार घेतलाः–

1) 2023 INSC 1054

SELVARAJ
V/S.
REVATHI

Hon'ble Apex Court held that, it is always the child/children who bear the brunt. For proper growth of a child, love and affection of both the parents is necessary. In any matter of custody of child, his welfare is paramount consideration.

2) AIRONLINE 2018 BOM 1230
Mrs. Payal SudeepLAdd @ Payal Sharma
v/s.
Sudeep Govind Laad

Hon'ble Bombay High Court held that,t he visitation rights can only be for some hours in the Court premises or at some convenient place in presence of mother of the child, who is aggrieved person, as defined in the DV Act.

Section 21 clearly express that the temporary custody of a child or children can be given to the aggrieved person or the person making an application on her behalf by making necessary arrangement for visit of such child or children by the respondent.

When the custody of the child lies with the wife, there would be no occasion for the wife for filing an application for custody. In that situation, husband will have remedy to have visitation right by filing application to that effect.

The smooth and proper development of the child requires affection of both parents. Clause-31 of the guidelines deals with overnight access. It is provided that the Courts shall consider that the child shall spend equal and substantive time with each parents.

It is the respondent i.e. father who has sought merely visitation right to his son which right was granted to him by the Trial Court that too for limited days. In case the visitation right is not given to the petitioner, minor child would be deprived of father's love and affection. The paramount consideration is welfare of child. The petitioner could not be faced to seek remedy either under the Guardians and Wards Act, 1890 and Hindu Minority and Guardianship Act, 1956, as observed by the Sessions Court as it would lead to multiplicity of litigation. The Act is a self contained code. The endeavour of the code should be

to cut short the litigation and to ensure that the child gets love and affection of both parents i.e. mother and father. The approach of the Court should be practicable to work out the modalities in practical manner in evolving the process whereby the child suffer minimum trauma. The interpretation of the statute should be purposive.

3) Cr.MMO No.206/2016 decided on 02.09.2016
Sandeep Kumar Thakur
v/s.
Madhubala

Hon'ble Himachal Pradesh High Court held that, in the instant case, custody of the child is already with her mother. The respondent has not asked for custody of the child for the simple reason that the child is already in her custody. It is the respondent, i.e. father, who has sought merely visitation rights to see his son, which right was granted to him by the learned Judicial Magistrate, 1st Class vide order dated 26.10.2015, that too, on limited days, i.e. 2nd and 4th Saturday of each month between 3.00 P.M. to 5.00 of P.M. In case the visitation right is not given to the petitioner, minor child would be deprived of father's love and affection. The paramount consideration is welfare of the child. The petitioner could not be forced rt to seek remedy either under Guardians and Wards Act, 1890 and Hindu Minority and Guardianship Act 1956, as observed by the learned Sessions Judge because it would lead to multiplicity of litigation. The Act is a self-contained code. The endeavour of the Court should be to cut-short the litigation and to ensure that the child gets love and affection of both parents, i.e. mother and father. The approach of the Court should be practical to workout the modalities in a practical manner by evolving the process, whereby the child suffers minimum trauma. The interpretation of statue should be purposive.

८. उत्तरार्थी आरती व अद्वीका यांनी अपीलासाठी नि.१५ चे लेखी उत्तर दिले की, सदरचा अर्ज कायदयाने टेनेबल नाही. अद्वीकाची ताब्याची मागणी मुळातच बेकायदेशीर आहे. आरतीने विलासविरुद्ध कौटुंबिक हिंसाचार अधिनियम अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये मुलीचे ताब्याची कोणतीही कायदेशीर तरतुद नाही. विलासने आरतीला कधीही प्रामाणिकपणे नांदविले नाही.

आरतीने केवळ अद्वीकाचे प्रेमापोटी व भविष्याचे दृष्टीने विलासचा अनेकवेळा छळ सहन करुन संसार करुन त्यास समजावून सांगितले आहे. परंतू त्याचा कोणताही परिणाम विलासचे स्वभावात झाला नाही. विलासने आरती व अद्वीकाचा स्वतःहून त्याग केलेला आहे. त्यानंतर विलास आरती व अद्वीका यांना भेटण्यासाठी आला नाही व त्यांची कधीही विचारपुस केलेली नाही. विलास आरतीस नेहमी मारहाण करीत असल्याने अद्वीका घाबरुन जात असे. त्यामुळे अद्वीकास विलासकडे जावून दिल्यास अगर भेटण्याची परवानगी दिल्यास अद्वीकाच्या जीवितास भीती निर्माण होण्याची शक्यता आहे. यापूर्वीही अद्वीका ज्युनियर के.जी.डेरे शाळेमध्ये शिकत असतांना विलास तिला भेटण्यासाठी गेला असता अद्वीका घाबरली असताना तिचा आरडाओरडा ऐकल्याने तेथे शिक्षकवर्ग जमा झाला. त्यानंतर आरतीला फोन करुन बोलावून घेतले. त्यावेळी विलासने आरतीला शिवीगाळ करुन मारहाण करण्याचा प्रयत्न केला. अद्वीकाला वडीलांविषयी कोणतेही प्रेम अथवा आदर राहिलेला नाही. अद्वीका संगमनेर येथे शिक्षण घेत असून आरती तिची संपुर्ण काळजी घेत आहे. आरतीचे आई, वडील व भाऊ तिची काळजी घेत आहेत. अद्वीकाला कोर्टात बोलावून काही प्रश्न विचारले आहेत. त्याची उत्तरे तिने व्यवस्थित दिली आहेत. तुला वडीलांना भेटण्याची इच्छा आहे का, असा प्रश्न अद्वीकाला कोर्टाने विचारला असता तिने ओरडून नाही असे सांगितले व रडून नाराज होवून म्हणाली की, मला व माझे आईला वडील नेहमी मारहाण करतात. त्यामुळे कोर्टाने अद्वीकाचा विचार करुन सदरचा नि.१४ चा अर्ज रद्द केलेला आहे. अद्वीका आरतीशिवाय राहू शकत नाही. अर्ज मंजूर झाल्यास तिचे मानसिकतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अर्ज नि.१४ रद्द करण्याची विनंती आरतीने केली आहे.

९. उत्तरार्थीचे सुविद्य वकील श्री.एम.बी.गुंजाळ यांचा युक्तीवाद असा की, विलास व आरती एकमेकांचे आते–मामे भावंड आहेत. अद्वीका तीन वर्षाची

असल्यापासून विलास व आरती विभक्त राहतात. विलासने अद्वीकाच्या शाळेत जावून शिक्षकांना दम दिला. त्यामुळे अद्वीका घाबरुन गेली. विलासने आरतीच्या माहेरी जावून सुद्धा तिला दम दिला होता. अद्वीका ही संगमनेर येथील पोदार शाळेत इयत्ता दुसरीत शिकते. विलासपासून अद्वीकाच्या जीवाला धोका आहे. आरती व विलास यांचे दरम्यान हिंदू विवाह याचिका प्रलंबित आहे.

१०. उभय पक्षकारांची विवाद्य कथने व त्यांच्या सुविद्य वकीलांचा युक्तीवाद विचारात घेता प्रस्तुत अपीलाचे न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष, कारणमिमांसेसहीत–

| अ.क्र | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | डी.व्ही. अर्ज १०२०/२०२२ मधील नि.१४ ची मागणी अद्वीकाचे हिताची आहे का ? | : | होय. |
| २ | न्यायदंडाधिकारी यांचे दिनांक २८.०२.२०२४ चे आक्षेपित आदेशात हस्तक्षेपाची आवश्यकता आहे का? | : | नाही. |
| ३ | आदेश ? | : | अपील अमान्य |

**<u>–:का र ण मि मां सा:–</u>**

**<u>मुद्दे क्र.१ व २ करीता</u> –**

११. उपरोक्त नमुद दोनही मुद्दे परस्परांशी निगडीत असलेमुळे साक्षीपुराव्याचे विश्लेषण व कारणमीमांसेची पुनरावृत्ती टाळणेकरीता त्यांचे विवेचन संयुक्त केले आहे.

डी.व्ही ॲक्टचे कलम २१ चे तरतुदीनुसार नि.१४ चे अर्जाद्वारे मागणी केलेल्या भेटीसाठी परवानगी मागण्याचा अधिकार विलासला आहे. In

view of the provisions of Section 21 of D.V. Act, original respondent Vilas is entitled for visitation or arrangement for visit of his daughter Advika. विलासची मागणी न्यायदंडाधिकारी यांनी अमान्य केल्यामुळे डी. व्ही. अक्टचे कलम २९ चे तरतुदीनुसार या न्यायालयाकडे दाद मागण्याचा अधिकार विलासला आहे.

१२. उभय पक्षकारांचे नातेसंबंध व विलास व आरती हे गेले अडीच वर्षाचे कालावधीत एकमेकांपासून विभक्त राहत आहेत ही वस्तुस्थिती उभयमान्य आहे. प्रस्तुत अपीलाचे न्यायनिर्णयासाठी सहा वर्ष वयाचे अद्वीकाचे हित, संगोपन, निकोप वाढ व कल्याण जपले जाणे हे निकष न्यायालयासमोर आहेत. अद्वीकाची शैक्षणिक, शारिरिक, मानसिक, भावनिक, बौद्धीक अशी सर्वंकष वाढ, प्रगती व विकास होण्यासाठी तिला जनक आई व वडील दोघांचे प्रेम, जिव्हाळा व आधार मिळणे तसेच उभयतांचे नातेवाईकांचे प्रेम व सहवास मिळणे आवश्यक आहे.

१३. गेल्या अडीच वर्षांमध्ये अद्वीकाची भेट विलास व त्याचे कुटंबियाशी झालेली नाही. या कालावधीत अद्वीका सातत्याने आरती व तिच्या माहेरच्या नातेवाईकांचे सहवासात असल्यामुळे तिला आरतीचा जिव्हाळा व ओढ विलासपेक्षा जास्त असणे स्वाभाविक आहे.

१४. शनिवारची शाळा संपल्यानंतर रविवार संध्याकाळपर्यंत अद्वीकाला विलासचे घरी राहून विलास व त्याचे आईवडीलांचा सहवास, प्रेम, जिव्हाळा मिळाल्यास तिचे अहित नाही. आज रोजी माझे निजीकक्षात अद्वीकाशी संवाद साधला असता तिने विलासला भेटायला ठाम नकार दिला. अद्वीकाला व आरतीला विलास मारहाण करतो अशी तिने तक्रार सांगितली. अद्वीकाशी संवाद साधल्यानंतर विलास, आरती व त्यांचे वकीलांना माझे निजीकक्षात बोलावले असता विलासला पाहून अद्वीका रडू लागली, घाबरली व अस्वस्थ दिसू लागली.

१५. अद्वीकाचे हितासाठी विलास व आरती एकत्र नांदावे असा प्रस्ताव मी आरती यांना दिला असता तो प्रस्ताव आरतीने ठामपणे नाकारला. विलासला

भेटणेस त्याचेसोबत २४ तास राहण्यामध्ये अद्वीकाचे कोणतेही अहित नाही असा या न्यायालयाचा अभिप्राय असला तरी ६ वर्षे वयाचे अद्वीकाला तिचे इच्छेविरुद्ध न्यायालयीन आदेशाचे जोरावर विलासकडे पाठविणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे डी.व्ही.अर्ज क्र.१०२०/२०२२ मधील नि.१४ चे अर्जाद्वारे विलासने केलेली मागणी अद्वीकाचे हिताची असली तरी दि.२८.०२.२०२४ चे आक्षेपित आदेशाने नि.१४ चे अर्जाची मागणी अमान्य करणारा सुविद्य न्यायदंडाधिकारी संगमनेर यांचा आदेश अयोग्य व बेकायदेशीर नाही. त्यामुळे सदर आदेशामध्ये हस्तक्षेपाची आवश्यकता नाही.

१६. उपरोक्त परिच्छेद क्र.११ ते १५ मधील विश्लेषण व कारणमीमांसेचे पार्श्वभुमीवर उपरोक्त परिच्छेद क्र.७ मधील नमुद न्यायनिवाडयांमधील न्यायतत्व हे प्रस्तुत प्रकरणातील अपीलार्थी विलासचे उपयोगाचे नाहीत.

उपरोक्त परिच्छेद क्र ११ ते १६ मधील विश्लेशण व कारणमीमांसेआधारे मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी व मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष नकारार्थी आहे.

**मुद्दा क्र.३ करीताः**–

१७. उपरोक्त परिच्छेद क्र.११ ते १६ चे विश्लेषण व कारणमीमांसा व मुद्दा क्र.१ चा होकारार्थी व क्र. २ चे नकारार्थी निष्कर्षाच्या पार्श्वभुमीवर आदेश,

आदेश

फौजदारी अपील क्र. ९/२०२४ अमान्य केले आहे.

MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Digitally signed by MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Date: 2025.07.07 16:23:53 +0530

संगमनेर ( मंदार नेरलेकर )

दिनांक – ०५/०७/२०२५ जिल्हा न्यायाधीश–२ व

अतिरिक्त सत्र न्यायाधीश,संगमनेर